# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## परिपत्रक

दिनांक ३०.०७.२०२१ रोजी झालेल्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठातील विभागात असलेले नादुरुस्त कालबाह्य झालेले फर्निचर, शास्त्रीय सामुग्री व उपकरणे, वाहन, संगणक व संगणकीय साहित्य (Write-off Committee) निर्लेखन करण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. संजय निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांकडुन त्या त्या विभागातील निर्लेखित करावयाच्या साहित्याची माहिती समितीने दिनांक २३.११.२०२१ व १३.१२.२०२१ च्या परिपत्रकानुसार विहीत नमुन्यात व विहीत मुदतीत मागविली होती. परंतू अद्यापही बऱ्याच शैक्षणिक /प्रशासकीय विभागांनी /कक्षांनी निर्लेखना संबधीची माहिती दिलेली नाही.

उपरोक्त बैठकीत समितीने ठराव करुन सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांना असे सुचित केले आहे की, `ज्या विभागांनी दिनांक २३.११.२०२१ च्या वित्त व लेखा विभागाच्या परिपत्रक क्रमांक १९१८-६७ नुसार अद्याप निर्लेखत करावयाच्या साहित्यांची तपशील सादर केलेला नाही, त्या शैक्षणिक व प्रशासकीय विभागांनी दिनांक २५.०१.२०२२ पर्यंत उपरोक्त नमुद परिपत्रकानुसार विहीत नमुन्यात सादर करावा. विभागाकडे इतर पडून असलेले साहित्य अथवा मशिनरी असल्यास व त्याबाबतच्या नोंदी विभागाकडे नसल्यासही अशा साहित्याची यादी सादर करावी. विभागामध्ये निर्लेखन करण्यायोग्य साहित्य नसल्यास तसे लेखी कळवावे. तपशिल सादर करण्याबाबत ही अंतीम सूचना देण्यात येत आहे. निर्लेखनासंबधी कार्यवाही न झाल्यास त्यास विभागप्रमुख जबाबदार असतील उपरोक्त तपशील सादर न करणाऱ्या शैक्षणिक व प्रशासकीय विभागांबाबत माहिती व्यवस्थापन परिषदेस सादर करण्यात येऊन याबाबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.`

विद्यापीठ परिसर, औरंगाबाद ][
संदर्भ क्र. वित्त व लेखा/२०२१/2707-36 ][
दिनांक १९.०१.२०२२ ][

प्र-वित्त व लेखाधिकारी

*****